# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (स्थापना विभाग)

जाहिरात क्र. 718/ज.स./2019 दि. 24/01/2019

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील, प्रकाश विभागातील हाती घेण्यात आलेल्या प्रकल्पाच्या ( एल. ई. डी. पथदिवे, सोलर पॉवर प्लांट व इतर प्रकल्प ) पर्यवेक्षण (Supervision) करीता करार पदधतीने "प्रमाणीत ऊर्जा लेखा परीक्षकाची (Certified Energy Auditor)" कंत्राटी तत्वावर शासन निर्णय दि. 17 डिसेंबर, 2016 नुसार अनुज्ञेय मासिक पारिश्रमिक तत्वावर 1 मार्च 2019 पासुन प्रथमतः 6 महिन्याच्या कालावधीकरिता भरावयाची आहे.

या करिता ब्युरो ऑफ एनर्जी एफिशियन्सी च्या वतीने नॅशनल प्रॉडक्टीव्हीटी कॉन्सील तर्फे ''प्रमाणीत उर्जा लेखा परीक्षक'' या पदाकरिता विहीत केलेली परीक्षा उत्तीर्ण असलेल्या, शासकीय/महानगरपालिकेतील, बि.ओ.टी. /पी.पी.पी. तत्वावरील स्ट्रिट लाईटींग, सोलर पी. व्ही. इ. प्रकल्पांच्या कामांचा अनुभव असलेल्या व महाराष्ट्र शासन किंवा इतर शासकीय सेवेतील किमान कार्य. अभियंता (विद्युत) स्तरावरून दि. 28 फेब्रुवारी 2019 पर्यन्त सेवानिवृत्त झालेल्या/होणा-या इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि. 07/02/2019 रोजी सकाळी 10 : 30 वाजता, अति. आयुक्त (II), सिव्हील लाईन्स, म.न.पा. नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ. क्र. | पदाचे नांव | एकुण पदे | वयोमर्यादा | शैक्षणीक पात्रता व अनुभव. |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रमाणीत ऊर्जा लेखा परीक्षक (Certified Energy Auditor) | 01 | कमाल 65 वर्षे | 1) महाराष्ट्र शासन स्थानिक स्वराज्य संस्था महामंडळे व इतर शासकीय सेवेतील सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता (विद्युत) या पदाचा किमान 5 वर्षाचा अनुभव.<br>2) मान्यताप्राप्त विद्यापीठाचा विद्युत अभियांत्रीकी स्नातक (Graduate Electrical Engineer)<br>3) ब्युरो ऑफ एनर्जी एफिशियन्सी च्या वतीने नॅशनल प्रॉडक्टीव्हीटी कॉन्सील तर्फे ''प्रमाणीत उर्जा लेखा परीक्षक'' या पदाकरिता विहीत केलेली परीक्षा उत्तीर्ण.<br>4) उमेदवार शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.<br>5) उमेदवाराविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. |

वरील उमेदवारांनी दि. 07/02/2019 रोजी सकाळी 10:30 ते 12.00 पर्यंतच्या दरम्यान आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणा–या उमेदवारांच्या नावाची नोंद करण्यांत येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अर्हता :–

1) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

2) इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज अति.आयुक्त(II),नागपूर महानगरपालिका, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांचेकडे सादर करावेत.

3) वयोमर्यादा विचारात घेतांना दि. 01/03/2019 ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.

4) उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती साक्षांकित करून जोडाव्यात. या पदावरील नेमणूक 1 मार्च 2019 पासुन करावयाची असल्याने, दिनांक 28 फेब्रूवारी 2019 पर्यन्त सेवानिवृत्त झालेल्या/होणा–या उमेदवारांनी त्यांना प्राप्त झालेली सेवानिवृत्ती बाबतची नोटीसची साक्षांकीत प्रत जोडावी.

5) उमेदवारांनी अर्ज सादर करून अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

6) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र /हमीपत्र उमेद्वाराला दयावे लागेल.

7) करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

8) मासिक पारिश्रमिक – शासकीय /निमशासकीय सेवा– सेवानिवृत्त अधिका–यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करून करार पध्दतीने नेमणूक करातांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी कायम राहील.

हस्ता/– अभिजीत बांगर<br>
आयुक्त<br>
महानगरपालिका, नागपूर

दि. 24/01/2019

# अर्जाचा नमूना

फोटो

1. पदाचे नाव :– ..........................................................

2. अर्जदाराचे नांव :– ..........................................................

3. पूर्ण पत्ता :– ..........................................................
..........................................................
..........................................................

भ्रमणध्वनी क्रमांक :– ..........................................................
ई–मेल आय डी :– ..........................................................

4. जन्म दिनांक :– ..........................................................

5. दि. 01/03/2019 ला वय :– ..........................................................

6. सेवानिवृत्तीचे वेळी धारण केलेले पद व कार्यालय :– ..........................................................

7. शैक्षणिक पात्रता :– ..........................................................
..........................................................

8. अ) सेवाकाळातील विभागीय चौकशी सुरू आहे/होती काय?
ब) असल्यास विभागीय चौकशीत शिक्षा झाली होती का?

9. अनुभव :–

| अ. क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेल्या पदाचे नाव | कालावधी (पासून – पर्यन्त) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | | |

स्वाक्षरी